# जिल्हा उद्योग मित्र समिती सभा  दिं. २०.०९.२०११   सकाळी ११.०० वाजता- इतिवृत्त

प्रथमत: महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र,अहमदनगर तथा सदस्य सचिव, जिल्हा उद्योग मित्र समिती सभा यांनी  मा.अध्यक्ष व उपस्थित सदस्यांचे स्वागत केले.  तदनंतर अध्यक्षांचे परवानगीने सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यांत आली.

| अक्र/ विषय क्र | विषयाचा तपशिल | विषय सादर करणारी संघटना/कार्यालय | सभेत सदर विषयावर झालेली चर्चा/निर्णय | कार्यवाहीचे कार्यालय | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | **मागील सभेचे इतिवृत्त वाचुन मंजुर करणे** | | | | |
| | जिल्हा उद्योग मित्र समितीची मागील सभा दिं. ३०.०५.११ रोजी संपन्न झाली होती.  सदर सभेच्या इतिवृत्तावर कोणत्याही सन्माननीय सदस्यांचा आक्षेप नसल्याने ते सर्वानुमते मंजूर करण्यांत आले | | | | |
| २ | **मागील सभेच्या इतिवृत्तावरिल कार्यवाहीचा आढावा** | | | | |
| २.१ | मे. सनफार्माजवळ नेहमी वाहने उभी असल्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होतो | मराठा चेंबर्स ऑफ कॉमर्स इंडस्ट्रिज अँड ॲग्रीकल्चर, अहमदनगर | वाहतूकीस अडथळा निर्माण होणार नाही याबाबतची पोलीसांनी त्वरित कार्यवाही करावी तसेच मा. जिल्हा पोलीस अधिक्षक यांना अर्धशासकीय पत्रान्वये कळविणेबाबतच्या मा.अध्यक्षांनी सुचना दिल्या. | पोलीस विभाग | |
| २.२ | महा नॉन बायोडिग्रडेबल गार्वेज नियंत्रण अध्यादेश २००६ व त्या अंतर्गत महा प्लॅस्टिक पिशव्यांचे (कॅरी बँग ) उत्पादन व वापर नियम २००६ व महा अविघटनशील घनकचरा नियम २००६ बबात | जिउके अहमदनगर | घनकचरा साठविणेसाठी मऔविमने राखीव मोकळया भुखंडावर जागा देणेचे मान्य केलेने सदरबाबत योग्य तो प्रस्ताव प्रदुषण नियंत्रण मंडळ व औद्योगिक संघटना यांनी तयार करुन पुढील सभेपुढे सादर करणेविषयी मा.अध्यक्षांनी सुचित केले | महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ व औद्योगिक संघटना | |
| २.३ | मऔविम क्षेत्रासाठी अतिरिक्त जमिन संपादनाबाबत | मराठा चेंबर्स ऑफ कॉमर्स इंडस्ट्रिज अँड ॲग्रीकल्चर, अहमदनगर | मऔविम करिता अतिरिक्त जमिन संपादनाबाबत मा.उद्योग राज्यमंत्री .म.रा. यांचे अध्यक्षतेखाली दिं.२१.०९.११ रोजी बैठक आयोजित केलेली आहे.<br>सदर बैठकीचा निर्णय मऔविमने सादर करणेविषयीच्या सुचना मा.अध्यक्षांनी दिल्या | मऔविम/ <u>धोरणात्मक निर्णय</u> | |
| २.४ | जिल्हा उद्योग केंद्र येथे सेतु कार्यान्वित होणेबाबत | अस्मिता, अहमदनगर | सेतु कार्यान्वित करणेचे काम प्रगतीपथवर असलेचे महाव्यवस्थापक, जिउके यांनी प्रतिपादन केले.  याबाबत लवकरांत लवकर कार्यवाही करणेबाबतच्या मा.अध्यक्षांनी सुचना दिल्या | जिउके, अहमदनगर | |

**pdfMachine**
**A pdf writer that produces quality PDF files with ease!**
Produce quality PDF files in seconds and preserve the integrity of your original documents. Compatible across nearly all Windows platforms, simply open the document you want to convert, click “print”, select the “Broadgun pdfMachine printer” and that’s it! Get yours now!

| अक्र/ विषय क्र | विषयाचा तपशिल | विषय सादर करणारी संघटना/कार्यालय | सभेत सदर विषयावर झालेली चर्चा/निर्णय | कार्यवाहीचे कार्यालय | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| २.५ | श्रीरामपुर सहकारी औद्योगिक वसाहतीस मुलभूत सुविधा पुरविणेबाबत | श्रीरामपुर सह.औद्योगिक वसाहत | श्रीरामपुर नगर पालिकेकडून सहकारी औद्योगिक वसाहतीस रस्ते,विज इ.बाबतच्या सुविधा पुरविणेबाबत पालिकेस पत्रान्वये कळविणेत यावे असे मा.अध्यक्षांनी प्रतिपादन केले | श्रीरामपूर नगरपालिका | |
| २.६ | नगर मनमाड रस्त्याचा जागतिक बँक प्रकल्पाच्या माध्यमातून रस्त्याचे चौपदरीकरणाचे काम सुरु आहे मात्र सिना नदीवरिल पुलाचे काम २ वर्षापासुन मंद गतीने सुरु आहे | मराठा चेंबर्स ऑफ कॉमर्स इंडस्ट्रिज अँड ॲग्रीकल्चर, अहमदनगर व अस्मिता, अहमदनगर | याबाबत सदर पुलाचे काम पुर्ण झालेले असुन सदर पुलावरुन वाहतूकही सुरु करणेत आले बाबतची माहिती जागतिक बँक प्रकल्प अधिकारी यांचे प्रतिनिधीनी सभागृहात दिली. त्यामुळे सदरचा विषय वगळण्यांबाबतच्या सुचना मा.अध्यक्षांनी दिल्या | - | - |
| २.७ | सुक्ष्म लघु आणि मध्यम उपक्रम अधिरियम २००६ अधिसुचना | जिउके अहमदनगर | सदचा अधिनियमाबाबतची माहिती महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र,अहमदनगर यांनी सभागृहास दिली सबबत सदरचा विषय वगळण्या बाबत च्या सुचना मा.अध्यक्षांनी दिल्या | - | |
| २.८ | समुह विकास योजना | जिउके अहमदनगर | समुह विकास योजनेबाबतची माहिती व सद्यस्थिती महाव्यवस्थापक,जिल्हा उद्योग केंद्र,अहमदनगर यांनी विशद केली. | जिउके | |
| २.९ | अहमदनगर सह.औद्या. वसाहतीमधील रस्त्याबाबत | अहमदनगर सह.औद्यो .वसाहत | सदरचा रस्ता हा खासदार निधीतून तयार केला असल्यामुळे त्यास वेगळा निधी उपलब्ध करुन देता आलेला नाही. सदर रस्त्याची दुरुस्ती महानगरपालिकेने दुरुस्त /डागडूजी करुन देणेबाबतच्या सुचना मा.अध्यक्षांनी दिल्या | महानगर पालिका अहमदनगर | |
| २.१० | सुपा औद्योगिक वसाहतीमध्ये पथ दिव्याची सोय करणेबाबत | सुपा इंडस्ट्रि मॅन्युफॅक्चर असो. | पथदिव्याचे काम पुर्ण झालेबाबतची माहिती उपअभियंता, मऔविम यांनी सभागृहास दिली. सबब सदरचा विषय वगळण्या बाबत च्या सुचना मा.अध्यक्षांनी दिल्या | - | - |
| २.११ | सुपा औद्योगिक वसाहतीमध्ये पोलीस स्टेशन होणेबाबत | सुपा इंडस्ट्रि मॅन्युफॅक्चर असो. | सध्या आऊट पोलीस चौकी असुन साधारणत: २०० उद्योग घटक कार्यान्वित असलेमुळे संघटनेने स्वतंत्र पोलीस स्टेशनची मागणी करणेबाबतचा प्रस्ताव सादर करणेबाबत मा.अध्यक्षांनी सुचना दिल्या | आद्योगिक संघटना | - |
| २.१२ | सुपा औद्योगिक वसाहतीमध्ये पाणी पुरवठयाची सोय होणेबाबत | सुपा इंडस्ट्रि मॅन्युफॅक्चर असो. | औद्योगिक वसाहतीचा पाणी पुरवठा सुरळित असल्याचे प्रतिपादन मऔविमचे उपअभियता यांनी सभागृहात केले सबबत सदरचा विषय वगळण्याबाबतच्या सुचना मा.अध्यक्षांनी दिल्या | -- | - |
| २.१३ | मऔविम पासुन अमदनगर शहराच्या रस्त्याच्या पुलाची होत असलेली दुर्दशाबाबत | अस्मिता अहमदनगर | सदरच्या रस्त्यालगत सर्व्हिस रोड असणे गरजेचे आहे. सदर ठिकाणी पुर्विचा आस्तित्वात असलेला मुळ रस्त्याची डागडूजी/दुरुस्ती सार्वजनिक बांधकाम खात्यांनी करावी अशा सुचना मा.अध्यक्षांनी दिल्या | सार्वजनिक बांधकाम खाते | - |

**pdfMachine**
**A pdf writer that produces quality PDF files with ease!**
Produce quality PDF files in seconds and preserve the integrity of your original documents. Compatible across nearly all Windows platforms, simply open the document you want to convert, click “print”, select the “Broadgun pdfMachine printer” and that’s it! Get yours now!

| अक्र/ विषय क्र | विषयाचा तपशिल | विषय सादर करणारी संघटना/कार्यालय | सभेत सदर विषयावर झालेली चर्चा/निर्णय | कार्यवाहीचे कार्यालय | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| २.१४ | बस सेवा सुरु करणेबाबत | मराठा चेंबर्स ऑफ कॉमर्स इंडस्ट्रिज अँड ॲग्रीकल्चर, अहमदनगर अस्मिता, नगर | बस सेवा सुरु करणेकामी बस थांबे निश्चित करणेकामी महानगरपालिकेस पुंनश्चः संपर्क साधुन संघटनेने कार्यवाही करणेविषयीच्या सुचना मा.अध्यक्षांनी दिल्या | औद्यो. संघटना/ महानगर-पालिका, अहमदनगर | |
| २.१५ | निबंळक ते केडगांव बायपास रोडबाबत | मराठा चेंबर्स ऑफ कॉमर्स इंडस्ट्रिज अँड ॲग्रीकल्चर, अहमदनगर | बायपास चे ३ किलोमिटर लांबीच्या रस्त्याचे डांबरीकरणाच्या कामकाजास मंजुरी मिळालेली असुन सदरचे काम पावसाळयानंतर हाती घेतले जाईल तसेच उर्वरित ४ किलोमिटरच्या रस्त्याची मंजूरी मिळेपर्यंत तात्पुरती दुरुस्ती/डागडूजी केली जाईल असे प्रतिपादन सार्वजनिक बांधकाम खाते यांचे प्रतिनिधीनी केले. सदर कामकाजास प्राधान्य देणेविषयी मा.अध्यक्षांनी सुचित केले | सार्वजनिक बांधकाम खाते | - |
| ३. उद्योग संघटनांनी उपस्थित केलेल्या प्रश्नावर चर्चा | | | | | |
| ३.१ | ग्रामपंचायत कर नवनागापुर ग्रामपंचायतीमार्फत उद्योजकाकडून कर आकारणबाबत | मराठा चेंबर्स ऑफ कॉमर्स इंडस्ट्रिज अँड ॲग्रीकल्चर, अहमदनगर | याबाबत संघनेने विहित करापेक्षा जास्त कर आकारणी केली किंवा कसे याबाबत संघटनेने खातरजमा करावी. तदनंतर संघटनेचे समाधान न झाल्यास` त्याबाबत योग्य ते संबंधितांकडे अपिल करणेबाबतचे मा.अध्यक्षांनी सुचित केले | आ.संघटना ग्रामपंचायत नवनागापूर | - |
| ३.२ | एमआयडीसी नगर हद्दीतील रस्त्यावरिल दिवे बंद असणेबाबत | मराठा चेंबर्स ऑफ कॉमर्स इंडस्ट्रिज अँड ॲग्रीकल्चर, अहमदनगर | एमआयडीसी, नगर हद्दीतील पथ दिव्याची दुरुस्ती मऔविम ने एका आठवडयाचे आत करुन दयाची असे मा.अध्यक्षांनी सुचित केले | मऔविम | - |
| ३..३ | एमआयडीसी क्षेत्रात विजपुरवठा सुरळित करणेबाबत | मराठा चेंबर्स ऑफ कॉमर्स इंडस्ट्रिज अँड ॲग्रीकल्चर, अहमदनगर | एमआयडीसी क्षेत्रातील एल ब्लॉक मध्ये वारंवार विजपुरवठा खंडित होतो सदर विजपुरवठा सुरिळत होणेबाबत महा.राज्य विज वितरण कं.नें कार्यवाही करावी असे मा.अध्यक्षांनी सुचित केले<br>उर्जा समितिची बैठक त्वरित घेऊन त्याचा अनुपालन अहवाल सादर करावा असे मा अध्यक्षांनी सुचित केले | महा.राज्य विज वितरण कं लि. अहमदनगर | - |
| ३.४ | एमआयडीसी नगर क्षेत्रांत फायर डिपार्टमेंटचे अधिकारी उपस्थित राहणेबाबत | अस्मिता अहमदनगर | उद्योजकांना एमआयडीसी अंतर्गत फायर डिपार्टमेंटचे मार्गदर्शन मिळणेकामी संबंधित अधिका-यांनी अहमदनगर कार्यालयास भेटीचा तपशिल जाहीर फलकावर लावावा व किमान पंधरा दिवसातून एक दिवस वेळ देणेबाबत मऔविमने त्यांचे मुख्यालयास पाठपुरावा करावा तसेच मऔविमकडे अर्धशासकीय पत्रान्वये कळविण्याविषयी मा.अध्यक्षांनी सुचित केले | मऔविम/ जिउके | |

**pdfMachine**
**A pdf writer that produces quality PDF files with ease!**
Produce quality PDF files in seconds and preserve the integrity of your original documents. Compatible across nearly all Windows platforms, simply open the document you want to convert, click “print”, select the “Broadgun pdfMachine printer” and that’s it! Get yours now!

| अक्र/ विषय क्र | विषयाचा तपशिल | विषय सादर करणारी संघटना/कार्यालय | सभेत सदर विषयावर झालेली चर्चा/निर्णय | कार्यवाहीचे कार्यालय | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| ३.५ | एमआयडीसी नगर क्षेत्रात निंबळकडे जाणा-या रस्त्याची | अस्मिता अहमदनगर | याबाबत सांगोपांग चर्चा होऊन एमआयडीसीने योग्य ती कार्यवाही करणेविषयीच्या सुचना मा.अध्यक्षांनी दिल्या | मऔविम | - |
| ३.६ | एमआयडीसी, नगर क्षेत्रात प्रादेशिक अधिकारी यांनी आठवडयांत कमीत कमी एक दिवस उपस्थित राहणेबाबत | अस्मिता अहमदनगर | प्रादेशिक अधिकारी, मऔविम यांनी आठवडयातून किमान एक दिवस जिल्हा कार्यालयास उपस्थित राहतात अशी माहिती मऔविम चे प्रतिनिधीनी सभागृहास दिली<br>सबब सदर विषय वगळण्याबाबतच्या सुचना मा.अध्यक्षांनी दिल्या | - | - |
| ४ | आयत्या वेळेचे विषय | | | | |
| ४.१ | नगर-मनमाड रस्त्यावरिल सनफार्मा चौकांत अनाधिकृत बांधलेल्या कमानीमुळे अपघात होणेचा धोक्याबाबत | अस्मिता अहमदनगर | सदरची कमान सार्वजनिक बांधकाम, जागतिक बँक प्रकल्प किंवा मऔविम यांचे पैकी कोणाचे हद्दीत येते याबाबतची प्रत्यक्ष जाऊन पाहणी करुन तसा अहवाल सादर करणेविषयी मा.अध्यक्षांनी सुचना दिल्या | सार्वजनिक बांधकाम/ जागतिक बँक प्रकल्प/ मऔविम | - |
| ४.३ | नगर-मनमाड रस्त्यालगत सनफार्माच्या कपौंडलगत अनाधिकृत कत्तलखाने असणेबाबत | अस्मिता अहमदनगर | नमुद कंपनी ही निर्यातक्षम उदयोग घटक असल्यामुळे सदर कत्तलखान्याचा घटकांवर विपरित परिणाम होऊ लागला आहे त्यामुळे त्वरित याबाबत पोलीस खाते व सार्वजनिक बांधकम खाते यांनी संयुक्त कार्यवाही करावी असे मा अध्यक्षांनी सुचित केले | पोलीस खाते सार्वजनिक बांधकाम खाते | - |
| ४.४ | डेक्कन मॅनेजमेट कन्सल्टंटस फिनिशींग स्कुल च्या मेंटॉर उपक्रमाबाबत | अस्मिता अहमदनगर | रोजगांर व स्वयंरोजगार विभागाच्या दिं २९.०६.२००९ च्या शासन निर्णयानुसार कमवा नि शिका या तत्वावर कमेन्स जनरेटर या घटकामध्ये तांत्रिक प्रशिक्षण घेतलेल्या बेरोजगार युवकांना प्रशिक्षण दिले जाते. व शासन निर्णयातील अटी व शर्ती प्रमाणे त्यांना मानधनही अदा केले जाते तथापि काही प्रशिक्षणार्थी उद्योग घटकामध्ये कायम स्वरुपी सामावुन घ्यावे म्हणून घटकाच्या व्यवस्थापनावर दडपण आणत आहेत ही बाब अस्मिता चे उपाध्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणुन दिली. त्यावर मा. अध्यक्षांनी नमूद शासन निर्णयास स्थानिक वर्तमानपत्रातुन सहारूयक संचालक, जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र यांनी प्रसिदधी दयावी असे सुचित केले. | जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार व मार्गदर्शन केंद्र | |

यानंतर काहीही विषय नसलेने मा.अध्यक्षांचे परवानगीने सभेचे कामकाज संपलेचे जाहीर करणेत आले

--सही/-
महाव्यवस्थापक
जिल्हा उद्योग केंद्र,अहमदनगर तथा
सदस्य सचिव,जिल्हा उद्योग मित्र समिती
सभा, अहमदनगर

---सही/-
जिल्हाधिकारी तथा
अयक्ष, जिल्हा उद्योग मित्र समिती

**pdfMachine**
**A pdf writer that produces quality PDF files with ease!**
Produce quality PDF files in seconds and preserve the integrity of your original documents. Compatible across nearly all Windows platforms, simply open the document you want to convert, click “print”, select the “Broadgun pdfMachine printer” and that’s it! Get yours now!

# जिल्हा सल्लागार समिती सभा दिं.२०.०९.२०११ सकाळी ११.०० वाजता- इतिवृत्त

जिल्हा उद्योग मित्र समितीची सभा संपलेनंतर मा.अध्यक्षांचे परवानगीने जिल्हा सल्लागार समितीची सभेच्या कामकाजास सुरुवात करणेत आली .

| अक्र/ विषय क्र | विषयाचा तपशिल | विषय सादर करणारी संघटना/कार्यालय | सभेत सदर विषयावर झालेली चर्चा/निर्णय | कार्यवाहीचे कार्यालय | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | **मागील सभेचे इतिवृत्त वाचुन मंजुर करणे** | | | | |
| | जिल्हा सल्लागार समितीची मागील सभा दिं. ३०.०५.११ रोजी संपन्न झाली होती. सदर सभेच्या इतिवृत्तावर कोणत्याही सन्माननीय सदस्यांचा आक्षेप नसल्याने ते सर्वानुमते मंजूर करण्यांत आले | | | | |
| २ | **जिल्हा उद्योग केंद्र ,अहमदनगर कार्यालयाचा केलेल्या कामाचा प्रगतीचा आढावा** | | | | |
| | महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र,अहमदनगर यांनी खालीलप्रमाणे जिल्हा उद्योग केंद्र कार्यालयाने माहे ऑक्टो-२०११ पर्यंत विविध योनांतर्गत केलेल्या प्रगतीचा आढावा सभेपुढे सादर केला | | | | |

| अक्र | योजना | उद्दिष्ट | | साध्य | |
|---|---|---|---|---|---|
| | | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक |
| १ | बिजभांडवल योजना | | | | |
| अ | सर्वसाधारण | ३३ | २०.०० | ०७ | ६.०० |
| ब | विशेष घटक योजना | ०२ | २.०० | ०२ | २.०० |
| क | आदिवासी उपयोजना | ०१ | ०.१० | ० | ०.० |
| ड | आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना | ०१ | ०.२० | ० | ०.० |
| | एकूण | ३७ | २२.३० | ९ | ८.०० |
| | | | | | |
| २ | जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजना | | | | |
| अ | विशेष घटक योजना | ०३ | १.०० | ० | ०.० |
| ३ | उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम | | | | |
| अ | सर्वसाधारण योजना | ३३४ | १०.०० | ० | ०.० |
| ब | विशेष घटक योजना | १६७ | ५.०० | ० | ०.० |
| | एकूण | ५०१ | १५ | ० | ०.० |
| ३ | जिल्हा पुरस्कार योजना | | | | |
| अ | सर्वसाधारण | ०२ | ०.३० | ० | ० |
| ४ | सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम नोंदणी | | | | |
| | | | | सन २०११-१२ | आतापर्यंत एकुण |
| अ | इम पार्ट-१ (अस्थायी ) | भौतिक उद्दिष्ट देणेत आलेले नाही | | ५२० | ३८१९ |
| ब | इम पार्ट-२ (स्थायी) | | | १८० | ५२०५ |
| | एकुण | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | **सन २०११ या कॅलेडर वर्षातील जिल्हा पुरस्कार निश्चितीस मान्यता देणे** | | | | |
| | प्रत्येक कॅलेडर वर्शातील जिल्हा पातळवर उत्कृष्ट कामगिरी करणा-या दोन लघुउद्योजकांना प्रथम पुरस्कार रु. १५००० रोख,शाल,श्रीफळ व मानचिन्हे, व दितिय पुरस्कार- रुपये-१०००० रोख, शाल,श्रीफळ व मानचिन्हे देऊन गौरविण्यांत येते. अशी माहिती महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, अहमदनगर यांनी सभागृहास दिली. त्याप्रमाणे सन २०११ या कॅलेंडर वर्षाचे पुरस्कार निश्चित करणेसाठी उपसमितीची स्थापना करणेत आली होती. उपसमितीमार्फत शासनाच्या अटी, शर्ती व निकषाप्रमाणे पात्र असणा-या अर्ज प्राप्त असणा-या लघुउद्योग घटकांच्या अर्जा मधुन खालील प्रमाणे दोन लघुउद्योग घटकाना पथम व दितीय पुरस्कार निश्चीत करणेसाठी उपसमितीने शिफारस केलेली आहे<br>**प्रथम पुरस्कार- मे. अश्वमेघ ॲग्रीटेक अँड फार्म सोल्युशन सिस्टीम<br>प्लॉट नं- ए-९७ , कोपरगांव सहकारी औद्योगिक वसाहत कोपरगांव<br>ता.कोपरगांव, जि-अहमदनगर<br>दितिय पुरस्कार- मे. सहयाद्रि इंजिनिअरिंग<br>प्लॉट नं ए-४/१, एमआयडीसी, श्रीरामपूर<br>ता-श्रीरामपूर जि अहमदनगर** | | | | |

**pdfMachine**
**A pdf writer that produces quality PDF files with ease!**
Produce quality PDF files in seconds and preserve the integrity of your original documents. Compatible across nearly all Windows platforms, simply open the document you want to convert, click “print”, select the “Broadgun pdfMachine printer” and that’s it! Get yours now!

| | |
|---|---|
| | सदर पुरस्कार निश्चित करणेस मा.अध्यक्षानी समितीच्या वतीने मान्यता दिली |
| ४ | आयत्या वेळेचे विषय |
| | आयत्या वेळेचे विषय उपस्थित झालेले नाही |

येणे प्रमाणे सभेचे कामकाज होऊन मा.अध्यक्षाचे परवानगीने सभेचे कामकाज संपलेचे महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, यांनी जाहीर केले

--सही/-
महाव्यवस्थापक
जिल्हा उद्योग केंद्र,अहमदनगर तथा
सदस्य सचिव,जिल्हा सल्लागार समिती
सभा, अहमदनगर

--सही/-
जिल्हाधिकारी तथा
अयक्ष, जिल्हा सल्लागार समिती
अहमदनगर

pdfMachine
A pdf writer that produces quality PDF files with ease!
Produce quality PDF files in seconds and preserve the integrity of your original documents. Compatible across nearly all Windows platforms, simply open the document you want to convert, click “print”, select the “Broadgun pdfMachine printer” and that’s it! Get yours now!

# सुक्ष्म,लघु,मध्यम व विशाल औद्योगिक उपकमामध्ये किमान ८० टक्के स्थानिक लोकांना प्राधान्य देणोबबतची समितीची सभा दिं.२०.०९.२०११

## इतिवृत्त

सुक्ष्म,लघु,मध्यम व विशाल औद्योगिक उपक्रमामध्यो किमान ८० टक्के स्थानिक लोकांना प्राधान्य देणेबाबतची (स्थालोरो ) समितीची सभेच्या कामकाजास जिल्हा सल्लागार समितीची सभा संपलेनंतर मा.अध्यक्षांचे परवानगीने सुरुवात करणेत आली .

| अक्र/ विषय क्र | विषयाचा तपशिल | विषय सादर करणारी संघटना/कार्यालय | सभेत सदर विषयावर झालेली चर्चा/निर्णय | कार्यवाहीचे कार्यालय | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | **मागील सभेचे इतिवृत्त वाचुन मंजुर करणे** | | | | |
| | स्थालोरो समितीची मागील सभा दिं. ३०.०५.११ रोजी संपन्न झाली होती. सदर सभेच्या इतिवृत्तावर कोणत्याही सन्माननीय सदस्यांचा आक्षेप नसल्याने ते सर्वानुमते मंजूर करण्यांत आले | | | | |
| २ | **मागील इतिवृत्तावरिल कार्यवाही** | | | | |
| | मागील इतिवृत्तावर कार्यवाही/अनुपालन प्रलंबित नाही असे महाव्यवस्थापक ,जिल्हा उद्योग केंद्र,अहमदनगर यांनी सभागृहास विशद केले | | | | |
| ३ | स्थानिक लोकांना रोजगार प्राधान्याने देणेबाबत चर्चा | | | | |
| | शासन निर्णय पत्र स्थालोरो-२००८/प्रक्र ९३/उद्योग-६ दिं १७/११/२००८ अन्वये उद्योगामध्ये स्थानिक नोक-यामध्ये पर्यवेषकीय श्रेणीत किमान ५० टक्के तसेच पर्यवेक्षकीयेतर श्रेणीत किमान ८० टक्के प्रमाण ठेवणे आवश्यक असल्याची माहिती सभागृहास खालीलप्रमाणे देणेत येत आहे. जिल्हा उद्योग केंद्र अंतर्गत नोंदणीकृत सुक्ष्म,लघु व मध्यम उपक्रमामध्ये उद्योग घटकामधील पर्यवेक्षकीय व पर्यवेक्षकीयेतर रोजगार व त्यापैकी स्थानिक लोकांना रोजगाराची दि ३१.०८.२०११ अखेरची माहिती खालीलप्रमाणे समितीच्या सभेपुढे महाव्यवस्थापक,जिल्ला उद्योग केंद्र, अहमदगनर यांनी सादर केला | | | | |

| अक्र | प्रवर्ग | संख्या | पर्यवेक्षकीय | | | पर्यवेक्षकीयेतर | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | एकुण | पैकी स्थानिक | टक्केवारी | एकुण | पैकी स्थानिक | टक्केवारी |
| १ | सुक्ष्म | ४१३५ | ४०६३ | ३७८४ | ९३ | २४१९५ | २२२५६ | ९२ |
| २ | लघू | १२५० | २४२५ | २२८० | ९४ | ११२०१ | १०३०४ | ९२ |
| ३ | मध्यम | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | एकुण | ५३८५ | ६४८८ | ६०६४ | १८७ | ३५३९६ | ३२५६० | १८४ |
| ३ | विशाल | ४४ | ३५५६ | ३२८० | ९२ | १९४६७ | १८३१० | ९४ |

याबाबत मा. अध्यक्षांनी असे सुचित केले की, शासनाच्या परिपत्रकाची काटेकोर अमंलबजावणी करावी

| | |
|---|---|
| ३ | मा.अध्यक्षांचे परवानगीने आयत्या वेळेचे विषय |
| | आयत्या वेळेचे विषय उपस्थित झाले नाहीत |

येणे प्रमाणे सभेचे कामकाज होऊन मा. अध्यक्षांचे परवानगीने सभेचे कामकाज संपलेचे जाहीर करणेत आले

--सही/-
महाव्यवस्थापक
जिल्हा उद्योग केंद्र,अहमदनगर तथा
सदस्य सचिव, स्थालोरो समिती
सभा, अहमदनगर

--सही/-
जिल्हाधिकारी तथा
अध्यक्ष, स्थालोरो समिती , अहमदनगर

pdfMachine
A pdf writer that produces quality PDF files with ease!
Produce quality PDF files in seconds and preserve the integrity of your original documents. Compatible across nearly all Windows platforms, simply open the document you want to convert, click “print”, select the “Broadgun pdfMachine printer” and that’s it! Get yours now!

# आजारी उद्योग समिती सभा दिं २०.०९.२०११

## इतिवृत्त

आजारी उद्योग समितीच्या कामकाजास सुक्ष्म,लघु,मध्यम व विशाल औद्योगिक उपक्रमामध्यो किमान ८० टक्के स्थानिक लोकांना प्राधान्य देणेबाबतची (स्थालोरो ) समितीची सभा संपलेनंतर मा.अध्यक्षांचे परवानगीने सरुवात करणेत आली

| अक्र/ विषय क्र | विषयाचा तपशिल | विषय सादर करणारी संघटना/कार्यालय | सभेत सदर विषयावर झालेली चर्चा/निर्णय | कार्यवाहीचे कार्यालय | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | मागील सभेचे इतिवृत्त मंजूर करणे | | | | |
| | आजारी उद्योग घटक पुनर्वसन समिती ची मागील सभा दिं ३०.०५.२०११ रोजी संपन्न झाली होती सदर सभेचे इतिवृत्त सर्व सन्माननीय सदस्याना पाठविणेत आलेले असून सदर इतिवृत्तावर कोणचेही आक्षेप/सुधारणा नसल्यास ते मंजूर करणे | | | | |
| २ | मागील इतिवृत्तावरिल कार्यवाही | | | | |
| | मागील इतिवृत्तावर कार्यवाही/अनुपालन प्रलंबित नाही असे प्रतिपादन महाव्यवस्थापक,जिल्हा उद्योग केंद्र,अहमदनगर यांनी सभागृहापुढे विशद केल | | | | |
| ३ | आजारी उद्योग घटकास प्रमाणपत्र देणेबाबतची चर्चा | | | | |
| | आजारी उद्योग घटकासं प्रमाणपत्र समितीची मान्यता घेऊन जिल्हा उद्योग केंद्रामार्फत दिली जातात. परंतु अशा घटकाने जिल्हा उद्योग केंद्राकडे अर्ज करतांना संबंधित वित्तीय संस्थेचे आजारी उद्योग असल्याचे घोषणापत्र तसेच विहित नमुन्यातील अर्ज ,ताळेबंद, विज बिल इ. कागदपत्रे सोंबत सादर करावी लागतात.<br>जिल्हा उद्योग केंद्राकडे मे. आरटीके इेजि. वर्क्स या उद्योग घटकाचा अर्ज प्राप्त झालेला असुन सदर अर्ज विहित नमुन्यातील नसुन त्यासोबत कुठलेही कागदपत्रे सादर केलेली नाहीत. सबब सदर उद्योग घटकांस सदर कागदपत्रे सादर करणेविषयी कळविण्यांत यावे असे मा अध्यक्षांनी सुचित केले | | | | |
| ४ | मा.अध्यक्षांचे परवानगीने आयत्या वेळेचे विषय | | | | |
| | आयत्या वेळेचे विषय उपस्थित झाले नाहीत | | | | |

येणे प्रमाणे कामकाज होऊन मा.अध्यक्षांचे परवानगीने सभेचे कामकाज संपलेचे महाव्यवस्थापक,जिल्हा उद्योग केंद्र,अहमदनगर यांनी जाहीर केले

-सही/-
महाव्यवस्थापक
जिल्हा उद्योग केंद्र,अहमदनगर तथा
सदस्य सचिव, आजारी उद्योग समिती
सभा, अहमदनगर

--सही/-
जिल्हाधिकारी तथा
अयक्ष, आजारी उद्योग समिती सभा
अहमदनगर

**pdfMachine**
**A pdf writer that produces quality PDF files with ease!**
Produce quality PDF files in seconds and preserve the integrity of your original documents. Compatible across nearly all Windows platforms, simply open the document you want to convert, click “print”, select the “Broadgun pdfMachine printer” and that’s it! Get yours now!

# जिल्हा पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम समिति सभा

## दिं. २०.०९.२०११ स. ११.०० वा.

## इतिवृत्त

जिल्हा पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम समिती सभेच्या कामकाजास , आजारी उद्योग समितीच्या सभेच्या कामकाजानंतर मा.अध्यक्षांचे परवानगीने सरुवात करणेत आली

| अक्र/ विषय क्र | विषयाचा तपशिल | विषय सादर करणारी संघटना/कार्यालय | सभेत सदर विषयावर झालेली चर्चा/निर्णय | कार्यवाहीचे कार्यालय | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | **मागील सभेचे इतिवृत्त मंजूर करणे** | | | | |
| | जिल्हा पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम समिती ची मागील सभा दिं ३०.०५.२०११ रोजी संपन्न झाली होती सदर सभेचे इतिवृत्त सर्व सन्माननीय सदस्याना पाठविणेत आलेले असून सदर इतिवृत्तावर कोणचेही आक्षेप/सुधारणा नसल्यास ते मंजूर करणे | | | | |
| २ | **मागील इतिवृत्तावरिल कार्यवाही** | | | | |
| | मागील इतिवृत्तावर कार्यवाही/अनुपालन प्रलंबित नाही | | | | |
| ३ | **पंतप्रधान रोजगार निर्मितीचा आढावा** | | | | |
| | पंतप्रधान रोजगार निर्मिती योजनेचा उद्योग संचालनालय,मुंबई यांचे पत्र दिं १६.०५.२०११ नुसार अहमदनगर जिल्हयास ४९ वाटप प्रकरणाचे (नोडल बँकेमार्फत मार्जिन मनी ) उद्दिष्ट प्राप्त झालेले आहेत .<br>पंतप्रधान रोजगार निर्मिती योजनेचा दिं ३१.०८.२०११ अखेर खालीलप्रमाणे प्रगती समितीपुढे सादर करण्यांत येत आहे | | | | |

| अक्र | क्षेत्र | उद्दिष्ट | | | शिफारस प्रकरणे | | | बँकेकडून मंजूर प्रकरणे | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | मार्जिन मनी | रोजगार | संख्या | मार्जिन मनी | रोजगार | संख्या | मार्जिन मनि | रोजगार |
| १ | ग्रामिण | २५ | ३४.३५ | २४५ | ३९ | ८४.७६ | २८९ | १८ | ४९.०१ | १६६ |
| २ | शहरी | २४ | ३२.९७ | २३५ | १४५ | १००.२७ | ४८७ | ७३ | ४६.९२ | २४० |
| | एकुण | ४९ | ६७.३२ | ४८० | १८४ | १८५.०३ | ७७६ | ९१ | ९५.९३ | ४०६ |

| बँकाकडून वितरण प्रकरणे | | | | बँकेकडून नोडल बँकेकेडे मार्जिन मनी दावे सादर | | |
|---|---|---|---|---|---|---|
| क्षेत्र | संख्या | मार्जिन मनी | रोजगार | संख्या | मार्जिन मनि | रोजगार |
| ग्रामीण | १८ | ४९.०१ | १६६ | १८ | ४९.०१ | १६६ |
| शहरी | ७३ | ४६.९२ | २४० | ७३ | ४६.९२ | २४० |
| एकुण | ९१ | ९५.९३ | ४०६ | ९१ | ९५.९३ | ४०६ |

| नोडल बँकेकडून बँकेकडे मार्जिन मनी जमा प्रकरणे | | | |
|---|---|---|---|
| क्षेत्र | संख्या | मार्जिन मनि | रोजगार |
| ग्रामीण | | ० | ० |
| शहरी | | ० | ० |
| एकुण | | ० | ० |

येणे प्रमाणे कामकाज होऊन मा. अध्यक्षांचे परवानगीने सभा संपलेचे महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र,अहमदनगर यांनी जाहीर केले

-सही/-
महाव्यवस्थापक
जल्हा उद्योग केंद्र,अहमदनगर तथा
सदस्य सचिव,जिल्हा पंतप्रधान रोजगार निर्मिती
समिती सभा, अहमदनगर

--सही/-
जिल्हाधिकारी तथा
अध्यक्ष, जिल्हा पंतप्रधान रोजगार
निर्मिती समिती सभा,अहमदनगर

pdfMachine
A pdf writer that produces quality PDF files with ease!
Produce quality PDF files in seconds and preserve the integrity of your original documents. Compatible across nearly all Windows platforms, simply open the document you want to convert, click “print”, select the “Broadgun pdfMachine printer” and that’s it! Get yours now!